**CNR No.MHSI01000250-2018**

## निशाणी १५ खालील आदेश

अपेलंट यांनी सामनेवाला नं ८ चे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून मागितलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडंट नं. १४ ते १६ यांनी अर्जावर म्हणणे दाखल केलेले आहे. सामनेवाला नं. ८ च्या वारसांना नोटीस पाठवूनही गैरहजर. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, सामनेवाला नं. ८ हे दि. ८/०५/२०१९ रोजी मरण पावले आहेत. त्यांना सरळ व कायदेशीर चार वारस आहेत. त्यांना अपिलामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. सामनेवाला नं. ८ हे गावामध्ये राहत नसल्याने त्याची माहिती अपेलंट यांना उपलब्ध होऊ शकली नाही. त्यानंतर माहिती मिळाल्यानंतर त्यांच्या वारसांची माहिती घेणे व कागदपत्रे मिळवण्यासाठी वेळ झाल्यामुळे अर्ज हा ९० दिवसांत हजर करू शकले नाहीत. त्यामुळे विलंबनाचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब वरील कालावधीमध्ये अबेटमेंट रद्द करून मागितलेली नसल्याने ती रद्द होणे आवश्यक आहे. तरी न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाला नं. १४ ते १६ यांनी म्हणणे दिले आहे की, मुळ दाव्यामध्ये मुदतीत वारस दाखल केलेले आहेत. त्यामुळे वारसांची माहिती नव्हती हे कारण खोटे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील सामनेवाला याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी सामनेवाला नं. ८ यांच्या वारसांना अर्जाची नोटीस पाठवली असता बजावणी झालेली आहे. बजावणी होऊनही कोणीही हजर झालेले नाही. अशा परिस्थितीमध्ये मुळ अर्जाचा गुणदोषावर निकाल देण्यासाठी व सामनेवाला नं. ८ च्या वारसांना संधी देण्यासाठी अर्ज मंजूर करणे योग्य होणारे आहे. अर्जास योग्य कारण दिले असल्याने मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अपेलंट यांचा निशाणी १५ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला नं. ८ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.11.13 17:05:03 +0530

( श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १२/११/२०२५